# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## अर्थ प्रशासन विभाग

---

जाक्र./अप्रवि/अंसेनियो/१२८०/२०२१ दिनांकः ०१/०३/२०२१

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर–2019/प्र.क्र.1/सेवा–9, दिनांक 30 जानेवारी, 2019 अन्वये, दिनांक 1 जानेवारी,2016 पासुन सुधारीत वेतन संरचना व त्यामधील प्रारभिक वेतननिश्चितीबाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2019 प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमानुसार वेतननिश्चिती करण्यातबाबत तसेच त्यानुषंगाने वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्यातबाबत स्पष्टीकरणात्मक सुचना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर–2019/प्र.क्र.8/सेवा–9, दिनांक 20 फेब्रुवारी, 2019 अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागु असलेल्या शासकीय कर्मचा–यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागु नसल्याने, अशा कर्मचा–यांच्या बाबतीत थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील, असे वरील परिपत्रकात नमुद करण्यात आले होते. त्यानुसार वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने शासन परिपत्रक क्र.वेपुर–2019/प्र.क्र.8/सेवा–9, दिनांक 30 मे, 2019 निर्गमित केले आहे त्या प्रमाणे वेतनाची थकबाकी प्रदान करण्यात यावे.

- सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी **शासन परिपत्रक क्र.वेपुर–2019/प्र.क्र. 8/सेवा–9, दिनांक 30 मे, 2019** परिपत्रकातील सुचना सर्व कर्मचा–यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्या प्रमाणे अंबलबजावणी करण्यात यावे.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलिपिः

१) मा. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना माहितीस्तव सादर.
२) सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, वेतन व लेखाधिकारी डॉ.पंदेकृवि, अकोला / वेतन व लेखाधिकारी नागपुर

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९
राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित
अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या
कर्मचाऱ्यांच्या थकबाकी प्रदानासंबंधी स्पष्टीकरण

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ३० मे, २०१९

वाचा :

१. शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक - ३० जानेवारी, २०१९

२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक - २० फेब्रुवारी, २०१९

परिपत्रक

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-२०१९ /प्र.क्र. १ /सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये, दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना व त्यामधील प्रारंभिक वेतननिश्चितीबाबतचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ प्रसिध्द करण्यात आले आहेत. या नियमांनुसार वेतननिश्चिती करण्याबाबत तसेच त्यानुषंगाने वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक: वेपुर - २०१९/प्र. क्र. ८ /सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नसल्याने, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील, असे वरील परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार वेतनाची अनुज्ञेय थकबाकी अदा करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

**वेतनाची थकबाकी प्रदान करण्याची पध्दती:-**

१. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू नसल्याने, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतन संरचनेतील वेतनाची अनुज्ञेय थकबाकी, आर्थिक वर्ष २०१९-२०२० पासून पुढील ५ वर्षांत ५ समान हप्त्यांत पुढे नमूद केल्याप्रमाणे रोखीने अदा करण्यात यावी:-

(अ) दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी ज्या प्रकरणी शासकीय कर्मचाऱ्याने निवृत्तिवेतन खात्यामध्ये अगोदर (असुधारित वेतनानुसार) दिलेली नियमित वर्गणी, सुधारित वेतन संरचनेत निश्चित केलेले वेतन विचारात घेता

नियमांनुसार विहित केलेल्या किमान वर्गणीपेक्षा कमी पडत असेल तर, ती थकबाकीच्या रकमेतून वसूल करून त्यावरील शासनाच्या उचित अंशदानासह अशी रक्कम स्तर - १ खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

**(ब)** उर्वरीत रोखीने द्यावयाच्या थकबाकीची निव्वळ रक्कम खालीलप्रमाणे सर्व शासकीय देय रकमा वजा /समायोजित करुन काढण्यात यावी :-

(१) वेतनाच्या सुधारित रकमेवर देय असलेली व्यवसाय कराच्या थकबाकीची रक्कम;

(२) शासकीय निवासस्थानामध्ये राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुधारित वेतनावर देय असणाऱ्या अनुज्ञप्ती शुल्काची रक्कम;

(३) दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत शासकीय कर्मचाऱ्याकडून काही शासकीय येणे असल्यास तीचे समायोजन;

**(क)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत सेवानिवृत्ति अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त झाल्या असतील, अशा कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ते सेवेत असलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाची थकबाकी अनुज्ञेय असल्यास, सदर थकबाकी, वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा / समायोजित करुन पाच समान हप्त्यांत पाच वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(ड)** थकबाकीचा एक हप्ता अथवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर सेवानिवृत्ति अथवा अन्य कारणास्तव सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, अदा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्यांची रक्कम (अनुज्ञेय असल्यास), वरील खंड (अ) व (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन समान हप्त्यात उर्वरित वर्षांत रोखीने अदा करण्यात यावी.

**(इ)** दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील वेतनाच्या थकबाकीची रक्कम अनुज्ञेय असल्यास, वरील खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा /समायोजित करुन एकाच हप्त्यात त्याच्या अवलंबिताना रोखीने अदा करण्यात यावी. त्याचप्रमाणे थकबाकीचा एक किंवा अधिक हप्ते रोखीने अदा केल्यानंतर मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अदा करावयाच्या बाकी असलेल्या हप्त्याची / हप्त्यांची रक्कमही त्याच्या अवलंबितांना वरील, खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या रकमा वजा / समायोजित करुन एकाच हप्त्यात रोखीने अदा करण्यात यावी.

| उदा.- दि. १ जानेवारी, २०१६ ते दि. ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीतील थकबाकीची रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करणे | | |
|---|---|---|
| १ | थकबाकीची रक्कम | रुपये ४,००,०००/- |
| २ | वरील खंड (अ) व (ब) नुसार वजा करायाची रक्कम | समजा, रुपये ५०,०००/- |
| ३ | थकबाकीची उर्वरित रक्कम [अ.क्र. १ (-) अ.क्र. २ ] | ३,५०,०००/- |
| ४ | वार्षिक हप्त्याची रक्कम (अ.क्र. ३ ÷ ५ वर्षे) | रुपये ७०,०००/- |
| ५ | रुपये ७०,०००/- ही थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ ते २०२३ या पाच वर्षांत दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी रोखीने अदा करण्यात यावी. | |
| ६ | एखादा कर्मचारी थकबाकीचे दोन हप्ते रोखीने अदा केल्यानंतर उदा. ऑक्टोबर, २०२० मध्ये सेवानिवृत्त झाला/अथवा त्याच्या सेवा समाप्त झाल्या तर, त्याला अदा करावयाचे बाकी असलेले थकबाकीचे तीन हप्ते सन २०२१, २०२२ व २०२३ या वर्षांत रोखीने अदा करण्यात यावेत. | |

२. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी थकबाकीच्या हप्त्याची रक्कम सन २०१९ पासून दरवर्षी दिनांक १ जुलै रोजी रोखीने अदा करावी.

थकबाकीची रक्कम संबंधित वर्षात दिनांक १ जुलै रोजी अदा केली जाईल याची विभागप्रमुख /कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी. या संदर्भात विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल.

३. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचना मंजूर केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सर्व विभाग प्रमुखांनी आपले अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना या बाबीवर येणारा अतिरिक्त खर्च विचारात घ्यावा. ही तरतूद योग्य त्या फेरफारांसह जिल्हा परिषदा व अनुदानप्राप्त संस्थांना देखील लागू राहील.

४. वेतनाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम संबंधित वर्षाच्या जून महिन्याच्या मासिक वेतन देयकाबरोबर काढण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ज्यांचे वेतन आस्थापना देयकावर काढण्यात येते, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्या वेतन देयकात संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या रकमेची एक वेगळी बाब म्हणून मागणी करावी. वेतन देयकाला जोडलेल्या विवरणपत्रात रोखीने अदा करावयाच्या थकबाकीच्या रकमेसह थकबाकीचा हप्ता क्रमांक स्पष्टपणे लाल शाईने दाखवावा. एका कार्यालयातून / विभागातून दुसऱ्या कार्यालय / विभागात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, रोखीने अदा करावयाच्या संबंधित वर्षाच्या थकबाकीच्या हप्त्याची रक्कम, असा कर्मचारी संबंधित वर्षाच्या दिनांक १ जून रोजी ज्या कार्यालयात कार्यरत होता त्या कार्यालयाने काढावी. दिनांक १ जून रोजी अन्य कार्यालयात

प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी तो ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयाने किंवा यथास्थिती विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख अशा त्याच्या आस्थापनाविषयक बाबी हाताळण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी थकबाकीच्या हप्त्याची रक्कम रोखीने अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

५. राज्य शासनाच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त इतर निधीमधून वेतन घेणाऱ्या प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्याच कार्यालयाने थकबाकीची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी.

६. पूर्व तपासणीच्या अभावी काही थकबाकी चुकीने परिगणित होण्याची शक्यता आहे आणि ती अतिप्रदान म्हणून ठरल्यास त्याची नंतर वसुली करावी लागेल. यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याची सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ सोबतच्या जोडपत्र - चार अनुसार असे लेखी वचनपत्र द्यावे लागेल की, वेतनाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम जमा झाली असे आढळून आल्यास ती भविष्यात देय होणाऱ्या रकमेशी समायोजित करुन अथवा इतर प्रकारे शासनास परत करील.

७. सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी या परिपत्रकातील सूचना सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

८. सदर परिपत्रक कार्यासन सेवा - ४ च्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १००, दिनांक २६ एप्रिल, २०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५३०१६०८०८४९०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhalchandra Jagannath Gadekar

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb8254056eab8a6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2019.05.30 16:38:07 +05'30'

(भा.ज.गाडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
३. अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता